:: प्रेस नोट ::

दि. १४/०२/२०२४

आरोपी लोकसेवक - श्री.शिवाजी कैलास ढोरमारे वय ३७ वर्ष,पद वरिष्ठ लिपीक(कंत्राटी),नेमणुक कार्यकारी अभियंता,प्रधानमंत्री ग्राम सडक योजना,महाराष्ट्र,ग्रामीणरस्ते विकास संस्था,छत्रपती संभाजीनगर यांना १००००/- ( दहा हजार रुपये) लाच स्विकारल्या वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड यांचेकडुन कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड |
| पोलीस स्टेशन | वेदांत नगर,छत्रपती संभाजीनगर. |
| गुन्हा नोंद कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | श्री.शिवाजी कैलास ढोरमारे वय ३७ वर्ष,पद वरिष्ठ लिपीक(कंत्राटी),नेमणुक कार्यकारी अभियंता,प्रधानमंत्री ग्राम सडक योजना,महाराष्ट्र,ग्रामीणरस्ते विकास संस्था,चेलीपुरा हायस्कुल बिलींग,रेल्वे स्टेशन रोड,छत्रपती संभाजीनगर |
| लाचेची मागणी रक्कम | १००००/- रुपये ( दहा हजार रुपये) |
| थोडक्यात माहिती | दिनांक १४/०२/२०२४ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार हे कार्यकारी अभियंता महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था,छत्रपती संभाजीनगर या पदावर कार्यरत असुन त्यांचे माहे जुन २०२३ ते माहे आक्टोंबर २०२३ या पाच महिण्याचे वेतन काढल्याचा मोबदला म्हणुन तक्रारदार यांचे कार्यालयातील वरिष्ठ लिपीक श्री.शिवाजी कैलास ढोरमारे हे प्रत्येक महिण्याकरीता २०००/- रुपये या प्रमाणे पाच महिन्याचे १००००/- रुपयांची मागणी करत आहेत. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड येथे तक्रार दिली.<br>दिनांक १४/०२/२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी केली असता लोकसेवक श्री.ढोरमारे यांनी पंचासमक्ष १००००/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.<br>दिनांक १४.०२.२०२४ रोजी सापळा लावला असता आलोसे श्री.ढोरमारे यांनी लाच रक्कम १००००/- लागलीच स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे.<br>.शिवाजी, कैलास ढोरमारे वय ३७ वर्ष,पद वरिष्ठ लिपीक(कंत्राटी),नेमणुक कार्यकारी अभियंता,प्रधानमंत्री ग्राम सडक योजना,महाराष्ट्र,ग्रामीणरस्ते विकास संस्था,छत्रपती संभाजीनगर यांना पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन १००००/-रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम स्विकारल्या वरुन त्यांना लाचरकमेसह ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे वेदांत नगर,जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदरची कारवाई मा.संदीप आटोळे,पोलीस अधीक्षक, लाप्रवि छत्रपती संभाजी नगर,मुकंद अघाव,अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि छत्रपती संभाजी नगर,यांचे मार्गदर्शनाखाली, श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक, बीड व पोलीस अंमलदार श्रीराम गिराम,हनुमान गोरे,भरत गारदे,अविनाश गवळी,स्नेहलकुमार कोरडे व चालक गणेश म्हेत्रे सर्व ला.प्र.वि.बीड युनिट यांनी कारवाई केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड

संकेतस्थळ :- **acbwebmail@mahapolice.gov.in**

ई-मेल :- **१) dyspacbbeed@mahapolice.gov.in**

**2) dyspacbbeed@gmail.com**

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- **acbmaharashtra.net**

टोल फ्रि क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२४४२-२२२६४९

व्हॉटस अप क. :- ९९३०९९७७००

पोलीस अधीक्षक,लाप्रवि, छत्रपती संभाजी नगर :- ९९२३०२३३६१

अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, छत्रपती संभाजी नगर :- ९८८१४६०१०३

पोलीस उप अधीक्षक,लाप्रवि,बीड :- ९३५५१००१००

पोलीस उप-अधीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.